# प्राचार्यांनी साधला विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद



देगलूर - अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलुर महाविद्यालय देगलूर मध्ये प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी पदवी व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्याशी महाविद्यालयातील अध्ययन, अध्यापन व मूल्यांकन या महत्वपुर्ण विषयाबाबत मुक्त संवाद साधला.

प्रारंभी आयक्यूएसी समन्वयक डॉ सुदाम लक्ष्मण कुमार यांनी महाविद्यालयात होणाऱ्या छ--उ पुनर्मूल्यांकन प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर स्तरावर आज उपलब्ध असणारे अभ्यासक्रम, संशोधन सुविधा याबाबत सविस्तर माहिती सांगून त्यांच्याशी संवाद साधला. नवप्रवेशीत विद्यार्थ्यांचीं मते व विचार जाणून घेतली. यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास विषयीच्या अनेक योजना बाबत प्राध्यापकांनी संवाद साधला. डॉ.आर.बी.लक्षटे यांनी कमवा व शिका योजना, डॉ. निरजकुमार

पान ४ वर ➢➢

## प्राचार्यांनी साधला...

उपलंचवार यांनी क्रीडा, एन. सी.सी., डॉ. बी. आर. कत्तुरवार यांनी छत्रपती राजश्री शाहू महाराज विद्यार्थी दत्तक योजना, डॉ. सुरेश काशिदे यांनी एन. एस. एस. बाबत सविस्तर माहिती दिली. तद्नंतर उपस्थित सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना महाविद्यालयातील सर्व विभाग, प्रयोगशाळा, भाषा शाळा, ग्रंथालय, स्पर्धा परीक्षा व मार्गदर्शन केंद्र, विद्यार्थीनी कक्ष, प्राध्यापक कक्ष यासह ईतर सर्व शैक्षणिक व भौतिक सुविधा डॉ. विनय भोगले, प्रा. विनोद काळे, प्रा डॉ आर. बी. लक्षटे, डॉ. शेख परवीन, प्रा.नागशेट्टीवार गंगा, प्रा.शेख तरनुम यांच्या सहकार्याने दाखवल्या. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, तत्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. संजय पाटील उपस्थित होते, या कार्यक्रमाचे सूत्र संचलन डॉ आर बी लक्षटे, आभार प्रदर्शन प्रा.विनोद काळे यांनी केले.

Scanned with OKEN Scanner